म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ११५९

REFBK-0006552
REFBK-0006552

# पुष्करिणी

वसन्त हेबळे

('कुसुमाकर')

REFBK-0006552



प्रकाशिका
सौ. शांताबाई मोहिले B. A.
एलिस ब्रिज अहमदाबाद

१९४४

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत

चित्रालेखन • कनु देसाई

मुद्रक•बचुभाई पोपटभाई रावत•कुमार कार्यालय•१४५४ रायपुर, अहमदाबाद

जीवन-पुष्करिणींतील कमलिनी

नलिनीस

# एका पत्रांतील उतारा

प्रिय ........................ ,

. . .   . . .   . . .   . . .   . . .

या महागाईच्या दिवसांत काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्यांत कितपत शहाणपणा आहे याविषयीं तूं प्रगट केलेला संशय योग्यच आहे. पण निद्रानाशावर एक रामबाण उपाय म्हणून हें प्रकाशन लोकोपकारक होण्याची शक्यता पुढील अनुभवावरून दिसल्यामुळें, प्रकाशनाचा मोह मला आवरत नाहीं. असें झालें कीं प्रवासांत आम्ही तिघे मित्र एकाच ठिकाणीं उतरलों व रात्रीं जेवणखाण आटोपल्यावर, त्या दोघांच्या गप्पांना सारखा ऊत आल्यामुळें मला कांहीं झोंप येईना. तास, दोन तास, तीन तास सहनशक्तीला ताण दिल्यानंतर, अखेरीला नाइलाजानें उठून मी माझें बाड बाहेर काढलें आणि जेआहेत्ते त्यांना एक एक कविता 'सुनावूं' लागलों. मात्रा अचूक लागू पडली व मिनिट दोन मिनिटांच्या आंतच दोघेहि घोरूं लागले ! !

वरील उपयुक्तता बाजूला ठेवली तर प्रसिद्धीची आवड या प्रकाशनाला कांही अंशीं कारणीभूत गणतां येईल. आणि ती नाहीं कोणाला ? सूर्यचंद्र प्रकाशतात, तारे चमचमतात, फुलें आपलें नाजूक सौंदर्य दाखवीत सुवास पसरतात, हें सर्व लोकांच्या नजरेंत येण्यासाठींच नाहीं का ?

स्नेहीजनांनीं दिलेलें उत्तेजन व केलेला आग्रहहि या प्रकाशनाला कारण आहे. विशेषतः सुविख्यात कवियित्री सौ. संजीवनी मराठे, नागपूरचे कवि व लेखक प्रा. भवानीशंकर श्री. पंडित, अहमदाबादचे अग्रगण्य डॉक्टर ग. बा. मोहिले व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शांताबाई मोहिले, सोलापूरचे नामांकित वकील श्री. यशवंत बा. वर्दे, 'सुमन' मासिकाचे संपादक म्हणून ज्यांची माझी प्रथम ओळख झाली ते सध्यां ठाणें येथील यशस्वी वकील श्री. बाळासाहेब चिटणीस व सौ. नलिनीबाई चिटणीस यांचा सस्नेहादर उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं.

. . .   . . .   . . .   . . .   . . .

वसंत

# अनुक्रम


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र-शारदेस- | १ |
| २ | फूलपांखरें | २ |
| ३ | संध्या-तारक | ३ |
| ४ | निर्झरराणी | ४ |
| ५ | मार्गांतल्या सुंदरीस- | ६ |
| ६ | चोरी | ७ |
| ७ | कल्पना-विहार | ८ |
| ८ | माझी आवड | १० |
| ९ | अमर क्षण | ११ |
| १० | आईच्या हृदयांत- | १२ |
| ११ | सागरास- | १३ |
| १२ | चतुर्थीची चंद्रकला | १५ |
| १३ | गोदेच्या कांठीं | १६ |
| १४ | सांज | १८ |
| १५ | नवयुगांतील नवा धर्म | २० |
| १६ | ईश्वरी योजना | २१ |
| १७ | शुक-विलाप | २२ |
| १८ | जन्मभूमीस- | २४ |
| १९ | क्षणभंगुरता | २५ |
| २० | पांखरास- | २६ |
| २१ | तारकेस- | २८ |
| २२ | महदंतर | २९ |
| २३ | हास्य | ३० |
| २४ | याचना | ३१ |
| २५ | ‘दृष्टीआड नको’ | ३२ |

| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| २६ | हृदय-तरंग | ३३ |
| २७ | घायाळ होऊन– | ३४ |
| २८ | एका उन्मनस्काचें गीत | ३५ |
| २९ | तारकेस– | ३६ |
| ३० | निर्वाणीची याचना | ३७ |
| ३१ | मूक-गीत | ३८ |
| ३२ | पौर्णिमा | ३९ |
| ३३ | काव्यमय सृष्टि | ४० |
| ३४ | 'हंस असा सतत वेल्हाळा'– | ४१ |
| ३५ | आई व मूल | ४३ |
| ३६ | प्रणय-गीत | ४४ |
| ३७ | भाव-अर्चना | ४६ |

# पुष्करिणी

वसन्त हेबळे
('कुसुमाकर')

# महाराष्ट्र-शारदेस–

(अभंग)

येतां सायंकालीं । रजनी माउली
विश्व तों उधळी । तारा पुष्पें ! १

येतां प्रातःकालीं । उषा जों हांसरी
निसर्ग उधळी । पुष्पराशी ! २

दिव्य तीं सुमनें । प्रेमें तुज देणें
इच्छिलें कवीनें, । होणें कैंचें ? ३

पुष्पांची अंजलि । रानीं गोळा केली
आतां तुजवरी । उधळीतों ! ४

रंगरूप नाहीं । वासही न कांहीं
परि प्रीतिपायीं । गोड होवो !! ५

# फूलपांखरें !

(शार्दूलविक्रीडित)

(एक लहान मुलगा आपल्या आई बरोबर बागेंत फिरत असतां तिला म्हणतो)

आई ! बागडती फुलांवर पहा हीं पांखरें गोजिरीं,
जातों त्यां धरण्यास तोंच उडुनी जाती किती सत्वरी !
स्वच्छंदें मजला फुलांमधुनियां त्यांच्यासवें खेळणें
आई ! आवडतें तसेंच मजला बागेंत कीं राहणें !! १

रात्रीं गोड फुलें नभांत फुलती, येती न तीं मोजण्या
जाती ना फुलपांखरें परि कशीं त्यांच्यासवें खेळण्या ?
होवोनी फुलपांखरूं, वद मला, कां मीच जाऊं वरी ?

—अश्रू हे परि पूस !–सोडुनि तुला
जाणार नाहीं दुरी !! २

# संध्या-तारक !

('चंद्र चवथिचा')

प्रीतिची  कळी
हृदयिं उमलली,
येइल हृदयेश म्हणुनि रजनि रंगली !  १

मूल चिमुकलें
पदरिं लपविलें
दिवसा जें रजनीनें,–दृश्य जाहलें !  २

कृष्ण-कुंतलीं
खोंविली कळी
जिंकाया निज नाथा कीं कुणी तरी !  ३

निर्जनीं वनीं
पसरि मोहिनी
एकान्तीं मुग्ध मधुर बालिका कुणी !  ४

काव्य-कल्पना,
मधुर भावना,
गात बसे स्मित-वदना कीं सुरांगना !  ५

# निर्झरराणी !

(अंजनी)

वनीं उधळिते मंजुळ गाणीं,
फुलां फुलविते मधु बोलांनीं,
काल घालवी खेळुनि, हंसुनी
ही निर्झरराणी ! १

कांठावरतीं हंसती सुंदर
फुलें, आइच्या जणुं मांडीवर,
निजवी त्यांना गाउनि झुळझुळ
ही निर्झरराणी ! २

लहरी, कीं ही गालिंची खळी,
पाहुनि रविकर मनीं लाजली,
शालू नेसे नव सोनेरी
ही निर्झरराणी ! ३

वनदेवीची सोबत सुंदर,
वसंत तैसा आहे प्रियकर
रमवी त्यांना गाउनि मंजुळ
ही निर्झरराणी ! ४

आनंद वसे निर्मल हृदयीं,
दुःखाची नच छाया येई,
हांसत, खेळत, नाचत गाई
ही निर्झरराणी ! ५

प्रातःकालीं उषा हांसतां,
हीहि हांसते गातां गातां,
नाचे तारा नभीं नाचतां
ही निर्झरराणी ! ६

जेथें जाई तेथें फुलवी,
गीतें गाउनि कुरणें हिरवीं,
दुसऱ्यांसाठीं देहा झिजवी,
ही निर्झरराणी ! ७

सायंकालीं थकुनी भागुनि
येतां गाई तैशा हरिणी
तहान शमवी पाजुनि पाणी
ही निर्झरराणी ! ८

आवडते ही मुलां फुलांना,
लहान थोरां पशुपक्ष्यांना,
स्फूर्ति गावया देई कविंना
ही निर्झरराणी ! ९

# मार्गांतल्या सुंदरीस

(शार्दूलविक्रीडित)

गालीं गोड हंसें तुझ्या उमटलें मार्गीं मला पाहुनी;
दुःखी या हृदयावरी पसरिसी कां माधुरी–मोहनी ?
होती आस जरी तुझी स्मित-सुधा लाभेल या जीवनीं
मी वेडावुन गे ! क्षणांत असतों गेलों तुला पाहुनी !

—आतां तूं निमिषांत होशिल परी अदृश्य एका क्षणीं,
मुग्धे ! ती स्मित-माधुरी स्मृतितलीं राहील संतोषुनी !

# चोरी !

(गझल्)

गुलाबी रंग सुमनांचा कुणीं हा लाविला गालीं,
जरी स्पर्धा गुलाबांशीं, नसे कां सांग ही चोरी ? १

हांसरे किरण तारांचे नाचती हांसऱ्या नयनीं !
कोठुनी सांग हे आले, गुंगला जीव मम त्यांनीं ! २

शशांका घेरितां जलदें शोभतो अंबरीं खुलुनी,
नसे का माधुरी त्यांची क्रीडतां केश तव वदनीं ? ३

उषेची कोमला दीप्ती शोभते मुग्ध मुखकमलीं
स्मित-सुधा अरुण-हास्याची विराजे रम्य तव अधरीं! ४

प्रेमला गीति सरितेची अखंडित कंठिं तव वसली;
हंसगति मंद पदकमलीं कशी गे सांग तव आली ? ५

चोरुनी सर्व इतुकेंही नाहिं का तृप्ति तव झाली,—
हृदय मम सर्व धन होतें त्यावरी धाड तव आली ! ६

मदन-धनु सज्ज परि ओष्ठीं राखण्या माल चोरीचा,
धजेना परत मागाया कवीची दीन ही वाचा !! ७

# कल्पना–विहार

(चंद्रकान्त)

प्रशांत रजनी राज्य चालवी अवनीवरतीं या
बाल निजवुनी जशी पाहते मातेची माया ! १

प्रफुल्ल होतें नील नभांगण सुंदर ताऱ्यांनीं,
मोदाश्चर्यें कंपवि हृदयें ईशाची करणी. २

नृत्य करिति या सुरबाला जणुं गगनांगणिं भासे
प्रभा सुनिर्मल नृत्यसवें कीं त्यांची नाचतसे ! ३

नंदनकुंजीं कारंजें कीं अमृतमय उडतें
तुषार त्याचे धवल मनोहर झळकति हे येथें ! ४

श्वेत-कमलिनी नील जलाशयिं पवनें कीं डुलती
तेजाचे कण गगनिं विखुरले येथुनि परि दिसती ! ५

नंदन वनिंचे हंस सरोवरिं विहार कीं करिती
मधुर गान जरि श्रवणिं न येई, दिसे धवल दीप्ती ! ६

कीं दंवबिंदू सुरलोकींच्या कमलपत्रिं पडले,
प्रभा मधुर निज वर्षित तेथें नाचत ते बसले ! ७

विश्वाधारें धारण केला पाचूचा करिट
शोभविती त्या तेजोयुत हीं रत्नें कीं अमित! ८

स्वर्गगतांनीं अवनीवरि निज प्रेमनिधानांला
'विसरूं नका' जणुं संदेशचि हा तिळगुळ पाठविला! ९

उच्च ध्येय कीं दाखविण्या जणुं तरुण भारतातें
विश्वाचा सम्राट पाठवी सुदिव्य दूतांतें; १०

स्फूर्तिदायका तेजो-गाना करिती हे तेथें
दिव्य गान तें, स्फूर्ति न त्यानें कोणाला येते ? ११

# माझी आवड

(शार्दूलविक्रीडित)

पुष्पें तीं नलगे गुलाब मजला, पद्मावली वा सरीं;
द्या, द्या, आणुनि पारिजातक-कळया त्या नम्र साध्या परी!
ज्योत्स्ना-भूषित कीं सुधाकर तसा दावूं मला तो नका;
पाहूं द्या मजला सुशील विनयी ती तारका बालिका ! १

जा, जा, सर्व महासरित्तटिं तुम्ही शोभा विलोकावया,
गातां निर्झरिणी वनांतरिं परी जाईन ऐकावया !
नोहे भव्य मला सुशोभित जरी प्रासाद कीं तो भला;
राहूं द्याच निसर्ग-निर्मित परी त्या एक कुंजीं मला ! २

विश्वाचें अधिपत्य तें मज नको सौवर्ण-सिंहासनीं,
–प्रेमाचें हृदयाधिपत्य पुरतें संतोष व्हाया मनीं !
कीर्तीचा ध्वज नावडे मजसि तो विश्वें जरी अर्पिला,
प्रीतीचा ध्वज एकलें हृदय कीं अर्पी, पुरे तें मला !! ३

# अमर क्षण

क्षणभरि जरि होशिल तूं पूर्ण सखे ! माझी
युग युग पाहीन वाट अमर त्या क्षणाची
भरतिल विश्वें अनंत मंगल क्षणिं तेव्हां
कण कण तो दिव्य क्षण उजळवील सर्वां !

# आईच्या हृदयांत–

(सुनीत)

शोधोनी शिणलों तुला चहुंकडे, कोठें न तूं आढळे;
तीर्थें पायदळीं कितीहि सरलीं, तूं कोण तें ना कळे.
केला वास वनीं, हिमाद्रि–शिखरीं त्वद्दर्शना घ्यावया
ईशा ! नाहिं तिथें कुठेंहि मज तूं आलासि भेटावया ! ४

जे पुण्यस्मरणीय, वंद्य जगतीं मोठे महात्मे असे,
स्वार्थाचा लवलेशही न हृदयीं ज्यांच्या कुठेंही वसे;
तेथें तूं असशील मानुनि यदा दृष्टी तिथें रोखिली,
कोठें कांहिंतरी उणीव मजला तेथें दिसों लागली ! ८

सारे सिंधु अपार, मुग्ध सरिता-उच्छृंखला बालिका,
वृक्षश्री, गिरिराज, पुष्पित तशी शोभा मनोहारिका,
तारे हीरक पाहिले उधळिले त्वां ज्यांस नीलांबरीं,
सौंदर्या अवलोकिलें तव, परी तृप्ती न ती लाभली ! १२

आईच्या हृदयांत वत्सल यदा मी एकदां पाहिलें
विश्वेशा ! तव रूप दृश्य मजला तेथें तदा जाहलें !! १४

सागरास–

गाइं गाइं गोड तुझीं हींच हास्य-गीतें !

हांसति नभिं चंद्रकिरण
कासारीं कुमुदिनि-मन
घेती जइं आकर्षुन;
—हास्यपूर्ण सृष्टी,
मिसळे तव गंभीरा ! त्यांत हास्यवृष्टी !! १

रौप्यगोल, रौप्य किरण,
जललहरी रौप्यवर्ण,
रौप्य ध्वनि,—रौप्य क्षण,
मधु-मिलाफ यांचा
गात गात करिसि सदा !—हास्य तुझी वाचा ! २

अमृत-मधुर हास्यवृष्टि;
कीं करिसी गुजगोष्टी—
पाहुनि तारा कष्टी
—रिझवाया तीतें ?
सुखविसि परि प्रणयपूर्ण आम्हां संगीतें ! ३

चालो तव सतत गान,
विसरुनि मग देहभान
ऐकतील सावधान
हास्य-लकेरींना
जन सारे !—हर्षवि त्यां घेत घेत ताना ! ४

हृदय असो खिन्न किती
करितां तूं हास्यवृष्टि—
उत्साहा ये भरती;
—हृदयिं मोद दाटे
गवसणिही गगनाला घालूं मग वाटे !! ५

## चतुर्थीची चन्द्रकला

इन्दुकला । ज्योत प्रीतिची गमे मला
बहु खुलवी । प्रभा हिची रजनी देवी ! १

वळण दिसे । सुर-सरितेचें सुंदरसें.
कीं होडी ? । दिसे न परि तो नावाडी; २

देवि गमे । खुडण्याला नक्षत्र-सुमें
घेउनि ही । नभःसरोवरिं कुणि जाई ! ३

कीं तीट । रेखियली सुन्दर नीट
रजनीनें । विश्व-बालमुखिं प्रेमानें ! ४

कीं कंठी । मोत्यांची घाली कंठीं
सुरबाला; । तीच गमे मज चन्द्रकला ! ५

कीं गजरा । दिव्य फुलांचा कुणि केला
रजनीला । प्रेमानें अर्पायाला ! ६

कीं धनु ही । सुरबालक कुणि करिं घेई;
शूर खरा । दूर पळवितो तमासुरा ! ७

निर्झरिणी । पाझरते कीं नभांतुनी
स्फूर्तीची, । शुभ्र, विमल मांगल्याची; ८

नभिं उधळी । तुषार-तारा कितीतरी,
वदति तिला । चतुर्थिची मधु चन्द्रकला ! ९

## गोदेच्या कांठीं—

गोड हांसतांना । चांदणें रम्य वाळवंटीं,
मित्रा, यशवंता ! । बसूं ये गोदेच्या कांठीं ! १

लहरी सरितेच्या । रुपेरी नाचत जें जाती,
अस्फुट गीताला । मंजुळ झुळझुळ गुणगुणती ! २

लीला या त्यांच्या । पाहुनी स्मृतीपथीं येती—
शैशव-कालींच्या । नाचऱ्या आनंदी वृत्ती ! ३

नाचत असतांना । नदीच्या लहरी या विरती,
तशाच विरल्या ना । आमुच्या आनंदी वृत्ती ! ४

'लहानपण दे गा—' । आठवे अभंग ही वाणी
नयनांतुनि वाहे । त्यासवें थोडेंसें पाणी ! ५

फुलली बघ वरतीं । फुलांची गोड बाग फुलती,
प्रतिबिंबें त्यांचीं । तरंगुनि नदीवरी डुलतीं ! ६

परमेशें लिहिलें । दिव्य जें गीत नभावरतीं,
पारायण वाटे । तयाचें करिते जलवंती ! ७

प्रतिध्वनी त्याचा । तरंगत तरंगिणी–हृदयीं
अस्फुट घुमतांना । कवींना स्फूर्ती मग देई ! ८

कोट्यावधि सूर्यां । टाकतिल मागें जे तारे
येथुनि परि बघतां । वाटती हिरेच इवलाले ! ९

अनंत विश्वाची । कल्पना अंधुक तों येई !
कुठें त्यांत आम्ही ? । सागरीं बिंदु जलाचाही– १०

आम्हांहुनि मोठा ! । क्षुद्र हें जीवित मनुजांचें
मातीसाठिं परी । घालिती सडेच रक्ताचे ! ११

क्षुद्र जरी असलें । आपुल्या थरारल्या वृत्ती
उच्च विचारांनीं । विसरुनी स्वार्थाची प्रीती ! १२

कृती तशी उतरो । आस ही अखंड हृदयांत
यश लाभो आम्हां । तुझें तर नांवच 'यशवंत' ! १३

सरस्वती–सेवा । जाहली विद्यापीठांत
जनतेची सेवा । करूं चल कांहीं जगतांत ! १४

# सांज !

(शार्दूलविक्रीडित)

होती सांज; तरंगिणी-तटि जला पाजोनि गेहाप्रती
गाई सर्व गुराखिल्या; अलगुजें मंजु ध्वनी काढिती.
वायूच्या झुळुकेसवें पसरतां ते सूर चोहींकडे,
लावी उत्सुक नेत्र गौळण कुणी सानंद वाटेकडे ! १

संध्येची समजावणी करुनियां अस्तास जाई रवी,
प्रेमानें कुरवाळुनी निज सखी चुम्बोनिया हांसवी !
जातां शेवटलीं सुवर्ण-किरणें फेंकी वनश्री-शिरीं,
संध्येसाठि चितारि प्रेमकवनें तीं मेघखंडांवरी ! ! २

स्वच्छंदें विहरे दरींतुनि तिथें मंदाकिनी चंचला,
होती प्रीत तिच्या अखंड हृदयीं, गीती मुखीं मंजुला !
प्रीतीच्या गुजगोष्टि सांगत सुटे ती आळवोनी जरी
पाषाणा नच स्पर्शली अरसिका त्या प्रीतिची माधुरी ! ! ३

आलीं नाचत कांहिं तेथ किरणें, लाटांवरी खेळलीं;
स्वर्गींची जलवन्ति-पृष्ठिं रमली नृत्यांगना भासली !
किंवा स्वप्नच रंगलें मधुरसें मंदाकिनी-मानसीं,
प्रीतीची मधु कल्पना विहरते कीं गोड काव्यीं जशी ! ४

टेंकोनी हनु आपुल्या करतलीं तेथें दिसे एकली
दृष्टी लावुनि शून्य पाहत जलीं बाला तरंगावली;
नाचोनी निटिलावरी भुरुभुरू वायूसवें कुंतल
नाचे कीं हृदयांबरीं सुचविती मेघावली श्यामल ! ५

होती हा ! न उजाडली जरि उषा त्या बालिकेची तरी
तीच्या नील, विलोल, साश्रु नयनीं संध्या दिसे रंगली !
सोनेरी किरणांसवें क्षण तिचीं तों खेळलीं आंसवें
अश्रू ते नच !–रंगलें परि तिचें दुर्दैव संध्येसवें !!! ६

# नवयुगांतील नवा धर्म !

(शार्दूलविक्रीडित)

('देवही दुबळ्यांचे कीं असणार किती बळी!'–'महाराष्ट्र-भाट')

पूर्वी संकटिं भक्त पाहुनि त्वरें ये विष्णु कीं धावुनी,
ब्रह्मा, शंकर आदि देवहि तसे हांकेस येती झणीं !
तेव्हां बाहुबलें स्वकीय करिती सारेच संरक्षण
रक्षी देव तयास रक्षण करी जो आपुलें आपण !! १

सिंहाचा जबडा करें उघडुनी दन्तांस जे मोजिती,
त्या कालीं भरतादि वीर अपुल्या भूमीस या भूषिती !
आतां ते वटवृक्ष जाउनि तिथें भूमी तृणानें भरे,
जेथें शौर्य तिथेंच भीति अवघी स्वार्थासवें वावरे !! २

मारा हांक कितीहि धांवुनि अतां येती न ते देवही
आम्हीं जों दुबळेपणास वरिलें दौर्बल्य ये त्यांसही !
होतां दुर्बल देव, धर्म विलया जाणार नाहीं कसा ?
आतां एकच धर्म कीं मिळविणें त्या पूर्विंच्या सद्यशा ! ३

देवांचा समुदाय स्वर्ग त्यजुनी उद्योगिं अज्ञां वसे
कर्तव्या निज एकनिष्ठ करणें कीं हीच पूजा असे !
आळस्या त्यजुनी प्रतिक्षण जरी कार्यीं अम्हीं योजिला,
होतां देव प्रसन्न वैभव पुन्हां देतील या भूमिला !! ४

# ईश्वरी योजना !

६५५२

दुःखोदधि जरि विशाल,
संसारीं या असार,
त्यांतहि परि सौख्यकाल
येइ क्वचित्कालीं
—भासत जणुं रजनि-पटल भेदि अंशुमाली ! १

भीषण जरि रजनिकालिं,
क्षण मोजित अंधारीं
वनराणी वास करी,
अनुभवि सुखकाला
उधळित खद्योत जईं प्रणय-दीप्ति-बोलां ! २

घन मदांध समराकुल
करितां नभिं युद्ध तुमुल
हो भीषण कोलाहल !
चपला या कालीं
क्षणभरि परि मधुर नृत्य दावि अंतरालीं ! ३

ध्येय उच्च आयुष्यीं;
समोरी विघ्नराशि
नैराश्यें हृदय ग्रासि !
सत्वरि त्या काला
मुखशशि तव वर्षित ये हृदयिं कौमुदीला!! ४

# शुक-विलाप !

( पृथ्वी )

यदा मधुर वर्षती जल-द पावसाच्या सरी,
जवें पवन वाहतां कुरण हर्ष-नृत्या करी;
फुलें बहरुनी फुले चहुंकडे वनश्री यदा,
मला त्यजुनि पंजरा बहु गमे उडावें तदा ! १

दिसे स्वपति-संगमा डुलत जाइ हर्षें नदी
सवें अनुज घेउनी मुदित-चित्त ओढा कधीं,
पडे श्रवणिं गीत जें सकल विश्व आनंदवी,
वदे जणुं 'पहा किती मधुर सृष्टि-शोभा नवी ! ' २

नसे अहह ! भाग्य तें मम ललाटिं आतां जरी,
उभीं नयनिं राहती सुखद पूर्वदृश्यें परी;
स्मरूनि सहचारिणीस, सहकार, स्वातंत्र्यही
गळे सतत अश्रुंची भिजवुनी मला धार ही !! ३

कधीं श्रवणिं ये यदा जल-द अंबरीं गर्जिती,
वदे मदिय पंजरस्थ शुक अन्य 'वाटे भिती !'
करी नभिं यदा तडित् मधुर नृत्य ती चंचला
भरुनि धडकी उरीं वदत 'वास येथें बरा !' ४

मला परि गमे असे नरक याहुनी कीं बरा,-
जरा तनु हले न तों सळसळे पदीं शृंखला !
पडोत घनगर्जना श्रवणिं सर्व रात्रंदिन,
दिपो नयन विद्युतें परि सुखें तरू सेवित ! ५

रुचे न परि हा विचार मम बांधवाला कदा;
'करीं धनि सुखी गिरा मधुर वर्षुनी, आपदा–
न येतिल तदा;' वदे 'गमत मार्ग हा बा भला !'
न वाद बरवा गणूनि बघतों तदा शृंखला ! ६

[illegible] सुखद वास तो सतत आम्रवृक्षावरी,
फळें मधुर सेवुनी सुजल प्राशणें निर्झरीं,
विहार वनितांसवें विकसतां वसंतीं वन !–
इथें पद हलों न दे किमपि शृंखला निर्घृण !! ७

# जन्मभूमीस–

(सुनीत)

वाडे भव्य, महाल सुंदर तसे, प्रासादही ते नको;
दासी, दास विलास कांहि नलगे; संपत्ति ?-तीही नको !
आई ! वास वनीं-तुझ्या पदतलीं दे ! एक हें मागणें,
वर्षो तेंवि मदीय जीवनिं सदा त्वत्प्रीतिचें चांदणें !

वाहे त्वद्हृदयांतुनी झुळझुळां जो प्रीतिचा निर्झर
आत्मा होइल तृप्त निर्मल सदा प्राशोनि त्याचें जल !
छाया शीतल, दाट या तरुतलीं, शांती सुखें सेवण्या,
'किल् बिल्' मंजुळ गान तेंवि मिळणें तें सर्वदा ऐकण्या !

जागोजाग जरी प्रफुल्ल सुमनें हांसोनियां पाहती
प्रीती याविण गे ! दुजी मज नको,-त्यांचीच दे संगती !
राहा दृष्टिपुढें तशींच शिखरें तीं उंच भव्याकृती
स्फूर्ती, शक्तिहि देउनी मजसि जीं नेतील ध्येयाप्रती !!

स्वर्गीचें सुखें तुच्छ ! काय महती त्याची ऐसे सांपडे ?
येथें मी बसुनी रचीन कवनें गातील चोहींकडे !!!

# क्षणभंगुरता

( मालिनी )

कमलदलिं प्रभातीं नर्तनीं मग्न राही
रविकर दंवबिन्दू तोंच शोषूनि घेई !
उपवनिं नव जेव्हां पारिजातें फुलावें,
सहज खुडुनि त्याला निर्घृणें तों चुरावें ! ४

शशि-उदयिं सुखाशा मोहवी तारकेला,
स्खलन तइं मिळावें दिव्य त्या बालिकेला !
प्रथम-प्रणय-पूर्ती बालरूपें फुलावी
जनक-हृदय–आशा तोंच काळें हरावी ! ८

अमित भुवनिं ऐशीं पाहतां नित्य दृश्यें
क्षणिक इहसुखाशा सत्वरी तों विनाशे !! १०

# जन्मभूमीस–

(सुनीत)

वाडे भव्य, महाल सुंदर तसे, प्रासादही ते नको;
दासी, दास विलास कांहि नलगे; संपत्ति ?-तीही नको !
आई ! वास वनीं-तुझ्या पदतलीं दे ! एक हें मागणें,
वर्षो तेंवि मदीय जीवनिं सदा त्वत्प्रीतिचें चांदणें !

वाहे त्वद्हृदयांतुनी झुळझुळां जो प्रीतिचा निर्झर
आत्मा होइल तृप्त निर्मल सदा प्राशोनि त्याचें जल !
छाया शीतल, दाट या तरुतलीं, शांती सुखें सेवण्या,
'किल् बिल्' मंजुळ गान तेंवि मिळणें तें सर्वदा ऐकण्या !

जागोजाग जरी प्रफुल्ल सुमनें हांसोनियां पाहती
प्रीती याविण गे ! दुजी मज नको,-त्यांचीच दे संगती !
राहा दृष्टिपुढें तशींच शिखरें तीं उंच भव्याकृती
स्फूर्ती, शक्तिहि देउनी मजसि जीं नेतील ध्येयाप्रती !!

स्वर्गींचें सुखें तुच्छ ! काय महती त्याची ऐसे यांपुढें ?
येथें मी बसुनी रचीन कवनें गातील चोहींकडे !!!

# क्षणभंगुरता

(मालिनी)

कमलदलिं प्रभातीं नर्तनीं मग्न राही
रविकर दंवबिन्दू तोंच शोषूनि घेई !
उपवनिं नव जेव्हां पारिजातें फुलावें,
सहज खुडुनि त्याला निर्घृणें तों चुरावें !

शशि-उदयिं सुखाशा मोहवी तारकेला,
स्खलन तइं मिळावें दिव्य त्या बालिकेला !
प्रथम-प्रणय-पूर्ती बालरूपें फुलावी
जनक-हृदय–आशा तोंच काळें हरावी !

अमित भुवनिं ऐशीं पाहतां नित्य दृश्यें
क्षणिक इहसुखाशा सत्वरी तों विनाशे !!

# पांखरास–

[परिस्थितीनें बांधलेल्या, निराशेनें ग्रासेलल्या व उच्च आकांक्षा अतृप्त राहिल्या-मुळें तळमळणाऱ्या जीवाची स्थिति पंख मोडलेल्या पांखरासारखीच नसेल काय?]

कां उगिच पांखरा ! तडफडसी ।
डोळे लावुनि आकाशीं ?
पंख तोडले दुर्दैवानें,
भुर भुर कोठें आतां उडणें,
–मानसिं विरलीं सारीं स्वप्नें !
उगिच कासया तळमळसी । नयन भिडवुनी ताऱ्यांशीं ? १

अंबरिंचा जरि तूं रहिवासी,
पंखांवांचुनि जाउं न शकसी
उंचावरच्या निजभवनासी !
शोक विफल परि कां करिसी। व्यर्थ कशास्तव तळमळसी ? २

जीवित तुजला अवनीवरचें
असह्य होउनि सदैव जाचे,
उतावीळ जरि आत्मा नाचे
उडुनि जावया आकाशीं, । शक्य कसें तें परि तुजसी ? ३

गात, गात नभिं विहरत फिरणें,
हिमनगशैलीं जाउनि बसणें,
मनुज-बाहुलीं तेथुनि बघणें
कींव तयांची करण्यासी । अवलोकुनि क्षुद्रत्वासी ? ४

अस्तंगत जों होई दिनमणि,
सोनेरी पोशाख चढवुनी
मेघखंड येतां त्यांवरुनी
उडणें की खेळायासी, । इंद्रधनू शोधायासी;- ५

नंदनवनिंचें मंजुळ गाणें
नभीं भरारी श्रवण्या घेणें,
ऐकत, ऐकत गुंगुनि जाणें;
विसर सर्व या क्रीडांसी ।-स्वप्नांतिल आनंदांसी ! ६

मोह घातला ज्यांनीं तुजला
हंसतिल रात्रीं सुंदर तारा
पाहुनि तुजला असा पांखरा
जा, बघूं नको तूं कोणासी ! यत्न करीं विसरायासी !! ७

तारकेस—

मधुर स्मित अधरावरि,
दीप्ति ललित नयनांतरिं,
गुंफिसि यां किरण-जालिं
गगनीं वेल्हाळे !
अपुरीं का ? नेसि म्हणुनि हृदयहि मम बाले ! १

नृत्य दिव्य गगनांगणिं
करिसी सखिजन जमवुनि
फुलली तैं ही यामिनि !
गीतहि मधु चाले,
श्राव्य न जरि, हृदयोर्मी उसळति त्या तालें ! २

भाग्यवन्त कोण असे
जिंकाया दावितसे
लीला तूं नृत्यमिषें ?
मी जरि तो, तारे
व्यर्थ श्रम, हृदय मदिय तव कधींच झालें !! ३

# महदंतर !

( गझल )

कुणि दंग होई सेवनीं पक्वान्न कीं अपुल्या घरीं,
परि येइना त्याच्या मनीं दारावरी भिक्षेकरी ! १

उबदारशा शयनीं मऊ सेवी सुखें निद्रा कुणी,
उघडा पडे रस्त्यावरी कुणि पाय पोटीं घेउनी ! २

गुणशून्य, कष्ट न काढतां मनुजा कुणा वरि संपदा,
श्रमतो कुणी थकुनी जरी नच जाइ त्याची आपदा ! ३

शोभे कुठें वदनावरी मधु हास्य तें आनंदुनी,
आंसू कुठें झरती परी कोमेजल्या नयनांतुनी ! ४

फुलली फुलें कुणि घेउनी शय्या प्रियेसाठीं रचे,
[illegible]वां चिता तिकडे कुणी मृत–वल्लभेसाठीं रचे ! ! ५

खळ[illegible]न् तुटे तारा नभीं जणुं गाळिते अश्रू निशा,
प[illegible] सागरा येतें हँसूं जें कंपवी दाही दिशा ! ६

बघुनी अशा महदंतरा सर्वत्र या अवनीवरी
ये खिन्नता मनिं, वाटते ही दैवलीला आसुरी ! ७

# हास्य

(मालिनी)

उडुगण हंसरा हा हांसवी यामिनीला,
वितरि हंसत तैशी चंद्रिका कौमुदीला;
खळ खळ जलवन्ती वाहतां मंजु हांसे,
पवन धरुनि ताला हांसतो पर्णि भासे ! १

फुलवि सकल सृष्टी गोड ती हास्यवृष्टी
सुखवित जनदृष्टी !–कोण राहील कष्टी?
हुरहुर परि लागे माझिया कां मनाला ?
हंसवुं मज शकेना सृष्टिची हास्यमाला ! २

श्रुतिपथिं जरि येई नाद तो शृंखलांचा
करुण रव तसा कीं दीन या हिंदभूचा,–
मुदित सकल होवो विश्वही मंजु हास्यें
मजसि परि कधींही हास्य येईल कैसें ? ३

# याचना !

(मालिनी)

फुलवि दशदिशांना ती उषा दिव्य बाला,
फुलवि गगन रात्रीं तारका-हास्य-माला,
फुलवित सुमचापें ये वनश्री वसन्त,-
फुलविं हृदय देवी ! गाउनी प्रेमगीत ! १

निज रुचिर कटाक्षें मोहवी सागराला
गगनिं शशिकला ती वर्षुनी चंद्रिकेला !
नयनशर तुझा गे ! गोड कीं त्याहुनीही-
मजवरि सखि ! रोखीं एकदां, याचना ही !! २

# 'दृष्टीआड नको !'

(सुनीत)

ताऱ्यांना बघतां तुझी स्मित-सुधा त्यांनीं गमे चोरिली,
रम्या की रदनावली सुचविती तूझीच त्या अंबरीं !
प्रीतीचीं किरणें त्वदीय नयनीं जीं हांसलीं, खेळलीं,
त्यांची अस्फुट कीं छटा दिसतसे ही तारका–संकुलीं !

पूर्णेंदू वदनांबुजा तव सखे !–मेघावली कुंतला,—
प्रीतीची सुषमा तशीच सुचवी इन्दुप्रभा मंगला !
वात्सल्यें भरल्या उदार हृदया तूझ्या मनोहारिणी !
विश्वाची जननी सदैव सुचवी ही वत्सला यामिनी !!

संपोनी रजनी, उषा उगवते पूर्वेस जों हांसरी
चित्तीं आठवितों सलज्ज हंसणें तें गोड !–ती माधुरी !!
जाई गुंगुनि जीव पूर्ण मम जों त्या गोडशा चिंतनीं
देसी सत्वरि देवि ! भेट मजला हृन्मंदिरीं येउनी !!

जेथें पाहिं तिथें तुझीच दिसते मूर्ती मला प्रेमले !
दृष्टीआड नको–नको क्षणभरी–केव्हांहि होऊं बरें !!

# हृदय-तरंग !

वाटे तारक हांसरे बघुनियां जावें वरी अंबरीं,
तेजोगान करोनि त्यांसह, तुला कीं तोषवावें तरी;
साऱ्या या जनसागरांतुनि तुला वेंचोनियां सत्वरी
धाडावी किरणावली सकल कीं हांसोनि तूझ्यावरी ! १

नाहीं ओळखणार प्रेमकिरणां पाहोनियां तूं मला,
'हांसे तारक कोण हा मजकडे ?' वाटेल किंवा तुला;
प्रीतीची मम जाहली न तुजला जाणीव येथें कदा,
—माझी ती किरणावली तरि तुला होईल कां सौख्यदा ? २

# घायाळ होऊन–

(गझल्)

वद, कां तुवां शर सोडले नयनांतुनी माझ्यावरी ?
जखमा अनंत न जाहल्या, परि एकली हो या उरीं !! २

जळते हृदीं अंगारशी, दे सारखी मज यातना,
लवलेशही न दया कशी हृदयीं तुझ्या उपजे परी ? ४

करिं कोमले ! झणिं त्यावरी प्रेमाश्रुशीतल-सिंचना !
जरि अन्त पाहसि निर्दये ! आटेल जीवन-निर्झरी !! ६

शर सोडुनी रवि सारखे घायाळ जों करि भूमिला,
व्रण शांतवी मधु-यामिनी आलिंगुनी तिजला परी ! ८

बघ, जाहली हृद्भूमिही घायाळ जर्जर ना पुरी ?
तव कृष्ण-कुंतल-यामिनी झणिं पांघरीं जखमेवरी !! १०

मज पाज ती मधुरा सुधा जी निर्झरे अधरांतुनी,
घायाळ जीव न त्याविणें जगणार या अवनीवरी !! १२

तो एक घोंटच प्राशुनी चैतन्य संचरतां हृदीं,
जखमा अनन्त खुशाल तूं करि त्यावरी वरचेवरी !!! १४

# एका उन्मनस्काचें गीत

(उन्मनस्काच्या गीतांत यमकांचीं बंधनें कोठून राहणार ?)

दोन्ही पंख उभारुनी तुजकडे यावें मला वाटतें
तोडूं ना शकतों परी जखडुनी जीं बांधिलीं बंधनें;
होती शक्ति तरी झुगारुनि दुरी केव्हांच या शृंखला
मी आलों असतों क्षणांत तुझिया पादांबुजां संन्निध !

मेघांच्याहि पलीकडे उडुनियां, ताऱ्यांसवें खेळण्या,
घेवोनी तुजला कधींच असतों गेलों हवा कापित !
हिंदोला मग चंद्रकोर करुनी, दोघांनिही त्यावरी
स्वर्गंगेतटिं गीत गात असते झोंके सुखें घेतले !!

दृष्टीआड असोनिही मम हृदा जी जाळते पोळते,
माझ्या मानसिं राहुनी नवल कीं तैशीच आल्हादते—
ती मूर्ती तव देवते ! कधितरी येईल का संन्निध ?
मी पाहीन युगेंहि वाट जरि तूं देशील आश्वासना !!

इच्छेला प्रतिबंध जेथ न वसे, प्रीती जिथें सौख्यदा,
भासे मौनहि जेथ दिव्य प्रणयें निःशब्द संगीतसें;
ताटातूट क्षणाचिही न घडते प्रेमी जिवांना जिथें
तेथें अक्षय नंतरी तुजसवें राहीन मी जाउनी !

नेत्रांना नच स्वर्ग तो दिसतसे, ना पृथ्विही दृक्पथीं
मी येथेंच अधांन्तरीं तळमळें ! कोणा कळे आग ही ?!

# तारकेस—

( गझल् )

कां लावसी मज ओढणी फसणार मी समजोनि का ?
झणिं आंवरी किरणावली !– मी जाणतों तूं दुर्लभा ! !
नेऊं नको मजला वरी जरि लोटणें अंतीं दुरी,
–स्थिति येथली जरि दुःखदा मज त्याहुनी गमते बरी ! !

क्षत पाडतें हृदयावरी तव हांसणें किरणांतलें,
स्मृति पूर्विची मग दाटुनी नयनांतुनी येती जलें !
जरि भास हो मज प्रीतिचा हंससी यदा मज पाहुनी
तूं देवता स्वर्गातली—येणार ना मम जीवनीं ! !

कां मोह हा मग घालसी ? स्मितजाल तें निज आंवरी !
बघ ते नभीं तुज योग्यसे नक्षत्रपुंज कितीतरी !
सरिता जशी रत्नाकरा, कीं यामिनी पूर्णेन्दुला,
तूंही तशी दे भेट गे ! निवडोनियां वर आपुला !

फुलवील जीवित वाटलें कुणि देवता मज एकदां
तूंही नको फसवूं मला,—मी अन्य साहिन आपदा ! !

# निर्वाणीची याचना !

( गझल् )

कां लाविलें मजला पिसें जरि देसि ना क्षण दर्शना,
जनतेंत व्हाया कीं हंसें मम जिंकिलें हृदयासना ? १

मुळिं धीर ना धरवे मला, क्षणिंचा वियोग न साहवे,
तुजवीण या जगिं एकला कधिंही मला नच राहवे ! २

तुज पाहतां प्रथमक्षणीं प्रतिमा मनोहर रेखिली
हृदयावरी, क्षण एकही नच दूर ती मुळिं जाहली ! ३

स्मरुनी तुला दिनरात मी कंठीं कसातरि काळ हा,
जगला खरोखरि एकल्या आशेवरी सखि ! जीव हा !! ४

हृदयांवरीं मम चंद्रिका तेजस्विनी तूं शोभसी,
मधुरप्रभा मम जीवनीं दिनरात अक्षय वर्षिसी ! ५

जमवी जरी अभ्रें कदा नैराश्य कीं हृदयांतरीं
वदनेन्दु कौमुदि वर्षतां तव कोमले ! पळती दुरी ! ! ६

वदशील ना मग सांग गे ! प्रेमें मला तूं “आपुला” ?
मधु बोल बोलुनि शांतवीं मम जीव जो जगिं तापला ! ७

हृदयीं तरीं धरुं दे तुला, स्वीकारुनी तुझिया करां,
पदधूलि वा शिरिं लावुनी मज जाउं दे देशांतरा ! ! ८

# मूक-गीत !

( गझल् )

सखि ! भावगीत माझें तूं नाहिं ऐकियेलें
—तुजसाठिं गाइयेलें ॥ धृ. ॥

हृदयांत वेदनांची तटिनी अखंड वाहे
तीरीं तिच्या बसोनी तुजसाठिं गुंफियेलें
—तूं नाहिं ऐकियेलें ! १

सौन्दर्य तारकांचें, नव-तेज चंद्रिकेचें
उकलोनि मृदु करांनीं तुजसाठिं दावियेलें
—तूं नाहिं पाहियेलें ! २

गेलें सखे ! विरोनी तें गीत अंतरालीं
परि त्याचिया स्मृतीनें होतात‍ि नेत्र ओले
—तूं नाहिं पाहियेलें ! ! ३

सखि ! भाव-गीत माझें तुजसाठिं गाईयेलें
—तूं नाहिं ऐकियेलें !

# पौर्णिमा

( केशवकरणी )

ही न चंद्रिका मधु पुनवेची, पान्हा फुटला स्तनीं
—पाजिते विश्व–बालका जनी !

अमृत–कलश हा सुरलोकींचा होइ न केव्हां रिता
शांतवी सारें जग तापतां !

चिर-यौवन अर्पिते ऊर्वशी चराचरा आपुलें
—जादुनें वाळवंटही फुले !

असीम सौंदर्याची जाणिव शशांक दे त्रिभुवना,
शांतिसह अशांति दे मन्मना !

या अथांग सागरिं रौप्य-लहरि नाचती
हृदयांतरिं उसळे खळबळ खळबळ किती
भावोर्मि मधुरशा रोमरोम पुलकिती !

अपूर्णता जरि वसे चहुंकडे इथें दिसे पूर्णता
इन्दु हा प्रीतिसिंधु वर्षितां !

# काव्यमय सृष्टि!

( सुनीत )

ईशा ! त्वां गगनीं किती विखुरल्या नक्षत्र-गीतावली,
यामा ज्यां अवलोकुनी प्रतिनिशीं ना केधवां भागली !
काव्यें दोन महा तशीं विरचिलीं कीं 'सूर्य' 'तारापती',
आम्ही कोण कवी ? कवीश्वर खरा तूं एक हें दाविती !

तैशीं नित्य नवीं अनेकविध हीं मेघांवरी गोडशीं
गीतें वा नकळे असंख्य गगनीं चित्रेंच रेखाटिशी !
हीं उत्तुंग प्रचंड शैल-शिखरें स्वर्गांत डोकावती,
वृक्षश्रेणि, तरंगिणी—सुकवनें त्यांभोंवतीं डोलती !

पुष्पें, बालक, बालिका, मधुर हीं काव्यें तुझीं भासती
संसारा फुलवावयाच रचिलीं कीं चालतीं बोलतीं !
बुद्ध, ख्रिस्त, परोपकार-रत जे, गांधी, महात्मे असे
त्यांच्या जीवनिं तेंवि दिव्य गमतें संगीत तूझें वसे !

सृष्टी काव्यमया दिसे चहुंकडे जी मोहवी मन्मना
माझें जीवन हेंहि काव्य करणें ईशा! तुला प्रार्थना!!

## 'हंस असा सतत वेल्हाळा'—

( अकुर )

स्वर्गांतुनि कां देवदूत हा आला,
फुलवितो हंसुनि हृदयाला!
जग सगळें हें भरलें दुखें दैन्यें
पापांच्या काळोखानें;
हें पाहुनियां देवा करुणा आली
दूताला पाठवि खालीं!

अंधारा दूर कराया
आनंद जगीं पसराया
आलासि चिमुकल्या राया!

ये, हांसत ये, देवांच्या लडिवाळा!
घालुं नको हास्या आळा! १

कीं मातेच्या पवित्र मधु हृदयाचें
उमललें सुमन प्रीतीचें!
त्या हृदयीं जीं अस्फुट गाणीं होतीं
गुंफियलीं बाल्यावस्थीं
त्या गीतांची मूर्त माधुरी सगळी
तव रूपें प्रगटित झाली!

निष्पाप सरल हृदयाचें
हें दृश्य मनोहर साचें
प्रीतीच्या मांगल्याचें

तुज पाहुनियां पळतिल दुःखें बाळा !
हंस असा सतत वेल्हाळा !! २

# आई व मूल

कडेवरी डुलतां
गोजिरें आईच्या मूल
वेलीवर डुलतें
वाटलें इवलालें फूल !

निर्झरराणी कीं
कवळिते कोमल कमलाला
रजनीमागोनी
अरुण कीं बाहेरी आला !

वसुंधरा माता
घेइ कीं वसंतरायाला
राजस फुलराणा
गमे हा कडेवरी फुलला !

स्वर्गंगा धरिते
चिमुकला चांद कडेवरतीं
कवन गोड किंवा
घुमतसे हें प्रतिभेवरतीं ! !

निष्पाप सरल हृदयाचें
हें दृश्य मनोहर साचें
प्रीतीच्या मांगल्याचें

तुज पाहुनियां पळतिल दुःखें बाळा !
हंस असा सतत वेल्हाळा ! ! २

# आई व मूल

कडेवरी डुलतां
गोजिरें आईच्या मूल
वेलीवर डुलतें
वाटलें इवलालें फूल !

निर्झरराणी कीं
कवळिते कोमल कमलाला
रजनीमागोनी
अरुण कीं बाहेरी आला !

वसुंधरा माता
घेइ कीं वसंतरायाला
राजस फुलराणा
गमे हा कडेवरी फुलला !

स्वर्गंगा धरिते
चिमुकला चांद कडेवरतीं
कवन गोड किंवा
घुमतसे हें प्रतिभेवरतीं !!

# प्रणय-गीत

तुझ्या नेत्रीं चकाकले
अंबरींचे सारे तारे
पहा लज्जेनें झांकले
मोतिं माणिक नी हिरे ! १

निववीते दग्ध मना
तुझी अमृताची दृष्टि
स्वर्ग ओढी धरेवरी
तव वात्सल्याची वृष्टि ! २

तुझ्या कुंतलीं यामिनी
मुखचंद्रा शोभा आणी
हिरा जणुं कीं कोंदणीं
—फूल हांसे पर्णांतुनी ! ३

साऱ्या पुष्पांची माधुरी
तुझ्या वदनीं पाहिली
साजणी ! तूं रूपराणी
अंतरंग गुणखाणी ! ४

तुझ्या कंठीं गोड गीत
सखि ! लोभावलें चित्त
तुझ्या हृदिं गोड भाव
माझा उचंबळे जीव ! ५

भिक्षेकरी तुझ्या दारीं
उभा प्रीतिचा भुकेला
तुझ्या मधुर मीलनीं
जीव माझा विसांवला !! ६

# भाव-अर्चना !

कष्टानें पद उचलुनि मार्ग चालतां
पान्था मज एकाकी मूर्ति तव दिसे
कंटकही मग फुलती, सृष्टि जणुं हंसे !
नव-चेतन हृदयिं स्फुरे बघुनी चारुता ! १

श्रमहारी पसरिसि तूं मम शिरावरी
मायेची मधु शीतल दाट सांवली
—हृद्वीणा अंतरिं कुणि छेडुं लागली
गोड गोड भावोर्मी उसळल्या उरीं ! २

REFBK-0006552
EFBK-0006552

स्निग्ध तुझी दृष्टि मधुर अमृताहुनी
भाग्यवन्त मी म्हणुनी मजकडे वळे
तनुमनिंचा दाह शांत होइ त्यामुळें
स्नेह-चिन्ह देउं तुला काय परतुनी ? ३

अर्पूं का पुनवेचें गोड चांदणें ?
त्याहुनि परि गोड तुझी हास्य-माधुरी !
मूठ भरुनि उधळूं का तारकाञ्जली ?
योग्य न तुज अर्पाया—तेज त्यां उणें !! ४

अंतरिंच्या गुंफुनियां सर्व वेदना
ओंविलीं अनंत त्यांत भावनाफुलें
आशांनीं रंगविला हार मंगले !
अर्पितसें त्यासह हो भाव-अर्चना ! ५



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५५२